# अभियांत्रिकीच्या १८९ विद्यार्थ्यांना नोकरी, ४.८० लाखांचे सरासरी पॅकेज

## ५९ कंपन्यांचा सहभाग, विदेशातही इंटर्नशिपची संधी

**प्रतिनिधी** | नाशिक

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मधील कॉम्प्युटर, आयटी, कॉम्प्युटर सायन्स अँड डिझाइन आणि आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स या विभागातील विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ५० पेक्षा अधिक नामांकित मल्टिनॅशनल उद्योग समूहांनी सहभाग घेतला. त्यांनी तब्बल १८९ विद्यार्थ्यांची निवड केली आहे.

१८९ विद्यार्थ्यांपैकी ७३ मुली व ११६ मुले आहेत. नोकरी मिळालेल्या विद्यार्थ्यांना सरासरी ४.८० लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज प्राप्त झालेले आहेत. या उद्योग समूहांमध्ये आयटी इंडस्ट्रीज, कोअर इंडस्ट्रीज आणि सर्व्हिस इंडस्ट्रीजचा समावेश आहे. तसेच नेटविन्स, टीसीएस, आणि जोश सॉफ्टवेअर यांसारख्या कंपन्यांचा समावेश होता. ॲप्टिट्यूड टेस्ट, ग्रुप डिस्कशन, टेक्निकल इंटरव्ह्यू आणि व्यक्तिगत मुलाखत अशा फेरीमधून विद्यार्थ्यांची निवड केली गेली.

### ८ विद्यार्थ्यांना विदेशामध्ये एक महिन्याच्या इंटर्नशिपची संधी

महाविद्यालयातील ८ विद्यार्थ्यांना दुबई येथील अलाइड कॅंट्र्याक्टिंग व फाइव्ह होल्डिंग्स या नामांकित कंपनी मध्ये एक महिन्याची इंटर्नशिपची संधी मिळालेली आहे. त्यामध्ये कॉम्प्युटर सायन्स अँड डिझाइन ४, मेकॅनिकलचे १, आयटी १ व सिव्हिलचे २ अशा एकूण ८ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्यांना इंटर्नशिपचे मानधन मिळणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी दिली. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

त्यापैकी काही कंपन्यांचे निकाल येणे बाकी आहे.

दरम्यान बाकी कंपन्यांच्या निकालातूनही ५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची प्लेसमेंटद्वारे नियुक्ती होणार असल्याचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी स्पष्ट केले आहे.

**Divya Marathi 12-06-2025**